जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक - २२३ दिनांक -२४/०४/२०२४**

गुन्हे शाखे अंतर्गत संयुक्त कारवाई

## गुन्हे शाखे कडुन २८ आरोपींन कडुन ४२ अग्निशस्त्रे व ७४ जिवंत काडतुसे जप्त

मा.पोलीस आयुक्त श्री.अमितेश कुमार पुणे शहर यांनी गुन्हे शाखेतील सर्व आधिकारी व अंमलदार यांची बैठक घेवुन बेकायदेशीर शस्त्रे बाळगणारे यांच्यावर प्रभावीपणे ऑर्म ॲक्ट प्रमाणे कारवाई करण्याबाबत व मोहीम राबविणेबाबत सुचना दिल्या होत्या.त्याअनुषंगाने मा.अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) श्री.शैलेश बलकवडे, मा.पोलीस उप आयुक्त (गुन्हे) श्री.अमोल झेंडे यांनी गुन्हे शाखेचे पथके तयार करुन खालील प्रमाणे मोहीम बाबत कारवाई करण्यात आली आहे.

दिनांक २१/०३/२०२४ रोजी गुन्हे शाखा,युनिट-३,पुणे शहर यांचेकडील पोलीस निरीक्षक श्रीहरी बहिरट,पोलीस अंमलदार कानिफनाथ कारखेले,महेंद्र कडू यांना मिळालेल्या बातमीवरुन आरोपी नामे १) प्रशांत मगम पवार, वय २८ वर्षे, रा.सिंहगड रोड,पुणे यांचेकडून **०१ अग्निशस्त्रे व ०२ जिवंत काडतुसे**,**एक किया कंपनीची कार**,आरोपी २) मेघराज ऊर्फ पप्पु लक्ष्मण दराडे,वय ३२ वर्षे,रा.अहमदनगर,याचेकडून **०४ अग्निशस्त्रे व १० जिवंत काडतुसे,एक रिकामी मॅग्झीन** ३) समीर हरिभाऊ हरपुडे,वय ३२ वर्षे,रा.कोथरुड पुणे याचेकडून **०१ अग्निशस्त्रे** असा **एकुण १९,४७,०००/-** रुपयेचा मुददेमाल हस्तगत करण्यात आला आहे.सदरचे आरोपीतावर यापुर्वी अपहरण,खंडणीची मागणी करणे,दरोड व शरिराविरुध्दचे गुन्हे दाखल आहेत.

दिनांक १४/०४/२०२४ रोजी गुन्हे शाखा, युनिट-३, पुणे शहर यांचेकडील पोलीस निरीक्षक श्रीहरी बहिरट,पोलीस अंमलदार संतोष क्षीरसागर यांना मिळालेल्या बातमीवरुन आरोपी नामे निखील राजु शिरसाठ, वय २१ वर्षे,रा.धायरी पुणे हा तडीपार असताना तो तडीपार आरोपी आश्विन ऊर्फ बारक्या लोणारे यांचा खुन करण्याचे तयारीत असताना शिवउदयान गोठा,सावर्जनिक शौचालयाजवळ,धायरी,पुणे येथे ताब्यात घेवुन त्याचेकडून **०६ अग्निशस्त्रे,१० जिवंत काडतुसे**,**एक डिओ मोपेड गाडी,एक लोखंडी कोयता** असा **एकुण २,८०,२००/-**रुपयेचा मुददेमाल हस्तगत करण्यात आला आहे.सदरचा आरोपी हा रेकॉर्डवरील गुन्हेगार असुन त्याचेवर यापुर्वी पुणेशहरामध्ये जबरी चोरी,दरोडा व बेकायदेशीर शस्त्र बाळगणे प्रमाणे गुन्हे दाखल आहेत.

दिनांक १५/०४/२०२४ रोजी गुन्हे शाखा, युनिट ३, पुणे शहर यांचेकडील पोलीस निरीक्षक श्रीहरी बहिरट,सहा पोलीस फौजदार सुनिल पवार यांना मिळालेल्या बातमीवरुन आरोपी नामे अश्विन बाळकृष्ण लोणारे,वय २० वर्षे,रा.धायरी,पुणे हा तडीपार असताना त्याचेकडे **०३ अग्निशस्त्रे,०६ जिवंत काडतुसे,होंन्डा**

**कंपनीची मोपेड,२)**वैभव आनंता तरडे, वय २३ वर्षे रा.धायरी पुणे याचेकडून **०३ अग्निशस्त्रे,०६ जिवंत काडतुसे,एकुण २,४८,०००/-** रुपयेचा मुददेमाल हस्तगत करण्यात आला आहे.सदर आरोपीस व अग्निशस्त्रे ताब्यात घेतल्यामुळे खुनासारख्या गुन्हयांस प्रतिबंध केला. सदरचा आरोपी हा रेकॉर्डवरील गुन्हेगार असुन त्याचेवर यापुर्वी पुणे शहरा मध्ये बेकायदेशीर शस्त्र बाळगणे प्रमाणे गुन्हे दाखल आहेत.

दिनांक २२/०३/२०२४ रोजी खंडणी विरोधी पथक १,गुन्हे शाखा, पुणे शहर यांचेकडील पोलीस निरीक्षक क्रांतीकुमार पाटील,पोलीस अंमलदार विजय कांबळे यांना मिळालेल्या बातमीवरुन आरोपी नामे सुरज रोहिदास खंडागळे,वय ३० वर्षे,रा.वारजे माळवाडी,पुणे याचेकडून एकुण **०१ अग्निशस्त्रे,०२ जिवंत काडतुसे** असा **एकुण ३०,२००/-**रुपयेचा मुददेमाल हस्तगत करण्यात आला आहे.सदरचा आरोपी हा रेकॉर्डवरील गुन्हेगार असुन त्याचेवर यापुर्वी पुणेशहरामध्ये बेकायदेशीर शस्त्र बाळगणे असे गुन्हे दाखल आहेत.

दिनांक २९/०३/२०२४ रोजी खंडणी विरोधी पथक १, गुन्हे शाखा, पुणे शहर यांचेकडील पोलीस निरीक्षक क्रांतीकुमार पाटील,पोलीस अंमलदार प्रफुल चव्हाण यांना मिळालेल्या बातमीवरुन आरोपी नामे सागर गणेश सुतार,वय २३ वर्षे,रा.वारजे,पुणे याचेकडून **०१ अग्निशस्त्रे,०२ जिवंत काडतुसे** असा **एकुण ३०,२००/-** रुपयेचा मुददेमाल हस्तगत करण्यात आला आहे. सदरचा आरोपी हा रेकॉर्डवरील गुन्हेगार असुन त्याचेवर यापुर्वी पुणे शहरामध्ये बेकायदेशीर शस्त्र बाळगणे असे गुन्हे दाखल आहेत.

दिनांक ३०/०३/२०२४ रोजी युनिट ५,गुन्हे शाखा,पुणे शहर यांचेकडील पोलीस निरीक्षक विश्वजीत काईगडे,पोलीस अंमलदार अकबर शेख व विनोद शिवले यांना मिळालेल्या बातमीवरुन आरोपी नामे अभिषेक अनिल भंडगे,वय २२ वर्षे,रा.गाडीतळ,हडपसर पुणे हा तडीपार असताना त्याला बस डेपोचे गेटजवळ,गाडीतळ,हडपसर पुणे येथुन ताब्यात घेवुन त्याचेकडून **०१ अग्निशस्त्रे व ०१ जिवंत काडतुसे** असा **एकुण ३०,४००/-** रुपयेचा मुददेमाल हस्तगत करण्यात आला आहे.सदरचा आरोपी हा रेकॉर्डवरील गुन्हेगार असुन त्याचेवर यापुर्वी पुणेशहरामध्ये बेकायदेशीर शस्त्र बाळगणे,वाहन चोरीचे प्रमाणे गुन्हे दाखल आहेत.

दि.०१/०४/२०२४ रोजी खंडणी विरोधी पथक २,गुन्हे शाखा,पुणे शहर यांचेकडील पोलीस निरीक्षक प्रताप मानकर,पोलीस अंमलदार सुरेंद्र जगदाळे व सचिन अहिवळे यांना मिळालेल्या बातमीवरुन विधी संघर्षग्रस्त बालक,वय १७ वर्षे, रा.धायरी गाव,पुणे,याचेकडून **०३ अग्निशस्त्रे व ०६ जिवंत काडतुसे**,०१ लोखंडी कटावणी,०१ स्क्रु ड्रायव्हर,०१ लाल मिरची पावडरची पुडी,०१ नायलॉनची दोरी, २) विधी संघर्षग्रस्त बालक वय १७ वर्षे,रा.धायरी गाव,पुणे याचेकडून **०१ अग्निशस्त्रे व ०२ जिवंत काडतुसे**,०१ स्प्लेंडर मोटार सायकल ३) विधी संघर्षग्रस्त बालक वय १७ वर्षे,रा.जनता वसाहत,पुणे याचेकडून **०१ अग्निशस्त्रे व ०३ जिवंत काडतुसे** हे त्याचे साथीदारासह स्मार्ट पॉईंट मॉल,डी.एस.के.रोड धायरी पुणे या मॉलवर दरोडा टाकण्याच्या तयारीत असलेले ७ ते ८ जण धायरी येथील डी.एस.के.स्कुल कडे जाणारे रोड लगत पार्कीगच्या मोकळ्या जागेत असे **एकुण १,१४,३८८/-** रुपयेचा मुददेमाल हस्तगत करण्यात आला आहे.

सदर गुन्हयांचे चौकशी दरम्यान गुन्हयातील पाहिजे आरोपी अजिंक्य ऊर्फ नवनाथ निलेश वाडकर याचे वडीलांचा २०१९ मध्ये सुनिल उर्फ चॉकलेट सुन्या डोकेफोडे याने त्याच्या मित्रासह खुन केला होता.त्या खुनाचा बदला म्हणून सदरचे अग्निशस्त्रे मध्यप्रदेश येथुन खरेदी करुन जवळ बाळगले असताना मिळून आले आहेत व सदरचे अग्निशस्त्रे ताब्यात घेतलेमुळे खुनासारख्या गुन्हा होण्याचे टाळले आहे.सदरचे विधी संघर्षग्रस्त बालके व त्याचे इतर साथीदार यांच्यावर पुणे शहरामध्ये खुनाचा प्रयत्न,अग्नीशस्त्राचा वापर करुन दरोडा,जबरी दुखापत करुन दरोडा,गर्दी मारामारी,बेकायदेशीर शस्त्र बाळगणे इत्यादी गुन्हे दाखल आहेत.

दिनांक **०४/०४/२०२४** रोजी गुन्हे शाखा, युनिट-२,पुणे शहर यांचेकडील पोलीस निरीक्षक नंदकुमार बिडवई,पोलीस अंमलदार उज्वल मोकाशी यांना मिळालेल्या बातमीवरुन आरोपी नामे ओमकार विनोद पवार,वय २५ वर्षे,रा.अपर बिबवेवाडी पुणे यास सॅलेसबरी पार्क,गुलटेकडी, पुणे येथे ताब्यात घेवुन त्याचेकडून **०१ अग्निशस्त्रे,०२ जिवंत काडतुसे** असा **एकुण ५०,८००/-**रुपयेचा मुददेमाल हस्तगत करण्यात आला आहे.सदरचा आरोपी हा रेकॉर्डवरील गुन्हेगार असुन त्याचेवर यापुर्वी पुणे शहरामध्ये बेकायदेशीर शस्त्र बाळगणे,दरोडा असे गुन्हे दाखल आहेत.

दिनांक **०९/०४/२०२४** रोजी खंडणी विरोधी पथक-२,गुन्हे शाखा,पुणे शहर यांचेकडील पोलीस निरीक्षक प्रताप मानकर,सहा.पोलीस फौजदार प्रदिप शितोळे व पोलीस अंमलदार पवन भोसले यांना मिळालेल्या बातमीवरुन आरोपी नामे अजय उर्फ भज्या प्रकाश निकाळजे वय ३१ वर्ष रा.कोंढवा बुद्रुक पुणे यास राजभोग हॉटेल समोर,विठ्ठलराव शिवरकररोड,केदारी गार्डन चौक जवळ,वानवडी पुणे येथे ताब्यात घेवुन त्याचेकडून **०१ अग्निशस्त्रे, ०३ जिवंत काडतुसे** असा **एकुण २६,५००/-** रुपयेचा मुददेमाल हस्तगत करण्यात आला आहे.सदरचा आरोपी हा रेकॉर्डवरील गुन्हेगार असुन त्याचेवर यापुर्वी पुणे शहरामध्ये खुनाचा प्रयत्न,दरोडा,जबरी चोरी प्रमाणे गुन्हे दाखल आहेत.

तसेच सदर कारवाई दरम्यान पुणे शहर आयुक्तालयातील गुन्हे शाखे व्यतिरिक्त १४ पोलीस स्टेशनने १४ आरोपीतांकडून १४ अग्निशस्त्रे व २० जिवंत काडतुसे असा एकुण २,९०,०००/- रुपयेचा मुददेमाल या कालावधीत रेकॉर्डवरील गुन्हेगारांकडून जप्त केलेला आहे.

| **शाखा / पो.स्टे** | **दाखल गुन्हे** | **आरोपी संख्या** | **अग्निशस्त्रे** | **जिवत काडतुसे संखा** | **जप्त मुददेमाल** |
|---|---|---|---|---|---|
| **गुन्हेशाखा** | ०९ | १४ | २८ | ५४ | १०,०५,१००/- |
| **पो. स्टे** | १० | १४ | १४ | २० | २,९०,०००/- |
| **एकुण** | १९ | २८ | ४२ | ७४ | १२,९५,१००/- |

सदरची कामगिरी ही मा.पोलीस आयुक्त,पुणे शहर श्री.अमितेश कुमार, मा.सह पोलीस आयुक्त, श्री.प्रवीण पवार, मा.अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) श्री.शैलेश बलकवडे, मा.पोलीस उप आयुक्त (गुन्हे) श्री. अमोल झेंडे, मा.सहा.पोलीस आयुक्त,गुन्हे १ श्री.सुनिल तांबे, मा.सहा.पोलीस आयुक्त,गुन्हे २ श्री.सतिश गोवेकर यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक श्री.प्रताप मानकर,श्रीहरी बहीरट,क्रांतीकुमार पाटील, नंदकुमार बिडवई व १४ पोलीस स्टेशनकडील अधिकारी व स्टाफने तसेच गुन्हे शाखेकडील पोलीस अंमलदार प्रदिप शितोळे,सुनिल पवार,सुरेंद्र जगदाळे,सचिन अहिवळे,कानिफनाथ कारखेले,महेंद्र कडू,संतोष क्षीरसागर,विजय कांबळे,प्रफुल चव्हाण,विनोद शिवले,अकबर शेख व उज्वल मोकाशी यांनी केलेली आहे.




महाराष्ट्र पोलीस
पुणे शहर पोलीस आयुक्तालय
पुणे
गुन्हे शाखा
पुणे शहर